ORM- 1A

N.C.R.B.
I. I. F.-1

# पहिली खबर
## First Information Report

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C ) 13584

राज्य महाराष्ट्र जिल्हा नाशिक पोलीस ठाणे उपनगर पहिली खबर क्र. II 183 वर्ष 2021 दिनांक 01/10/2021
State District Police Station FIR No. Year Date

(i) अधिनियम Act शस्त्रास्त्रप्रतिबंध अधि. सन १९४८ कलमे Sections कलम ७ व ३ प्रमाणे
(ii) अधिनियम Act ..... कलमे Sections .....
(iii) इतर अधिनियम व कलमे Others Acts and Section .....

(a) अपराधाची घटना : वार गुरुवार तारीख पासून 30/09/2021 वेळ 11:11 तारीख पर्यंत ..... वेळ .....
Occurrence of Offence : Day Date from Time Date to Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी Pअशी खूण करा. Time applicable portion )
1) 00.00 ते 03.00 2) 03.00 ते 06.00 3) 06.00 ते 09.00 4) 09.00 ते 12.00 5) 12.00 ते 15.00
6) 15.00 ते 18.00 7) 18.00 ते 21.00 8) 21.00 ते 24.00 9) 06.00 ते 18.00 10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 01/10/2021 वेळ 00:20
Information received at P.S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 03/2021 तारीख 01/10/2021 वेळ 02:35
General Diary Reference : Entry No Date Time

माहितीचा प्रकार Type of Information : लेखी लेखी / तोंडी Written / Oral .....

1. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा 2 Km दक्षिण चौकी/बीट/दुरक्षेत्र नाव व क्रमांक गुलमोहर नगर पो. चौकी
Place of occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/ Beat/ O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाण नाव श्री खरटे यांचे कार्यालयाचे ठाणातील देखभालीखाली ठिकाणाचे नंबर गल्ली रस्त्याचे नाव द्वारका चौक नाशिक-पुणे रोड
Adress of Occurrence Name No. if any Ward Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण ..... गाव ..... पोस्ट ..... तालुका नाशिक जिल्हा नाशिक राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable Place : Village Post Taluka Dist State

(c) पोलीस ठाणेचे हददीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..... तालुका ..... जिल्हा ..... राज्य .....
In case , Outside the limit of this Police Station Taluka Dist State

5. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complaint/ Informant : Permanent Adress

(a) नाव वर्षा उर्फ वॉशी प्रेम शातरानी Name (b) वडिलांचे / पतीचे नाव प्रेम शातरानी Father's / Husbands Name
(c) जन्म तारीख व वय 32 वर्षे Date of Birth & Age (d) राष्ट्रीयत्व भारतीय Nationality फोन नं 9011777772 Phone No
(e) पारपत्र क्रमांक — Passport No दिल्याची दिनांक — Date of Issue दिल्याचे ठिकाण — Place of Issue (f) व्यवसाय व्यावसाय Occupation
(g) धर्म Religion हिंदु जात Caste रोहीरी जन जात Sub caste
(h) पत्ता : गल्ली/सर्वे नं कोटा नं. 2 गाईगोठा कालनी रहाटवाडा, चाकणचा गाव, देहुरोड जि. पुणे Address : Ward House/Name No Phone/M No Pan No Card No

रस्त्याचे नाव ..... जवळचे प्रसिध्द ठिकाण ..... गाव ..... पोस्ट ..... पो. स्टे .....
Road Nearest Identifiable place Village Post P. Stn.

तालुका नाशिक जिल्हा नाशिक राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता वरिल प्रमाणे
Taluka Dist State Present Addresss

माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I-B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलचा जोडावे.)
Details Name & Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case diary)

1) आलोरे. पिराजीराव श्री गहेश तागनरात शिंदे वय. 38 रा. कालिका नगर त्रिकोणी बगल्याचा मागे, हिरावाडी नाशिक 2) खातुणी इरसा - श्री संजय आझाद खरटे वय. 45 रा. गंगा निवारा देवुन्हाळेजोशी रामाजी रोड नाशिकरोड

शा.मु.औ (के) २०३-(५,०००पुस्तके)-१+२०५०

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबनाची कारणे ..... तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant .....

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकुर पाठीमागे लिहावे
Particulars of properties stolen and involved ( Attach necessary Proform) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मुल्य .....
Total value of properties stolen/involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover properties) 2000/- रु. दुरुस्ती 25 चामडी नोटा तसेन 2000/- रु.

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक 125 जी नोंद ( रक्कम 3,00,000/- रु.
Unnatural/ Accident Death. Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
F.I.R. Information brief Content (Attach separate sheets, if required) : Detail Write down back blank page.

बायुरा नमुद तक्रारदार श्री. ठि. पोलीस आलोरे श्री गहेश शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडे आरोपीगण फिर्यादी मॅच चे बेटिंग चा गुन्हा दाखल न करण्याबाबी यातील तक्रारदार यांचेकडे दिनांक 29/09/2021 रोजी पंच, साक्षीदार यांचे समक्ष लाचेची मागणी करुन, तर नमुद लाच ही संजय खरटे यांचेकडे देण्याचे सांगितलेवरुन तक्रारदार यांचेकडुन दिनांक 30/09/2021 रोजी संजय खरटे यांनी तक्रारदार यांचेकडुन तर नमुद लाच पंचा- समक्ष स्विकारलेनंतर मिळुन आला म्हणुन गुन्हा.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2. मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा पोनि / श्री जगन्नाथ शिरसाट ( ला. प्र. वि. नाशिक)
2. तपास नाकारण्यात आला. त्याचे कारण. .....
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..... जिल्हा ..... राज्य .....
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I. O.) ..... Rank ..... No .....
to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to ..... (3) Transferred to P.S. .....
District ..... on point of jurisdiction.

तक्रारदाराने/फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R read over to the Complaint / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complaint/ informant, free of cost
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. १. न्यायालयात सरदर केल्याची तारीख .....
1. Date and Time of submitted to the Court

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer Incharge, Police Station
संपूर्ण नाव Name उपनगर पोलीस स्टेशन नाशिक
पदनाम Rank राजा. ठकी. चौधरी
तपासिक अं. चा कोड क्र. पोलीस ठाणे अंमलदार
Posting. उपनगर/उपनगर पो.स्टेशन
Code No. of I. O. .....

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधिक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complaint, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report (के) -Form- I- A

Scanned by CamScanner

फिर्याद

उपनगर पोलीस ठाणे, नाशिक शहर
दिनांक ३०/०९/२०२१

माझे नाव हरीष उर्फ बॉबी प्रेम थावरानी, वय-३२ वर्षे, व्यवसाय- [illegible] व्यवसाय, राहणार- बंगला नं.०९, [illegible] कॉलनी सहा नंबर नाक्याचे मागे देवळाली कॅम्प, नाशिक. मो.क्रं.९०११[illegible]

उपनगर पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो कि, मी वरील नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासह राहत असून नाशिक [illegible] करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

माझे विरुध्द उपनगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे [illegible] आयपीएल क्रिकेट बेटींग बाबतचा गुन्हा दाखल आहे [illegible] पी.एस.आय श्री महेश शिंदे उपनगर पोलीस स्टेशनचे पथकामध्ये होते.

[illegible] देवळाली कॅम्प नाशिक येथील फ्लॅट वर माझा मित्र [illegible] त्याचे कुटूंबासह राहतो. दि.२१/०९/२०२१ रोजी रात्री [illegible] वाजेच्या सुमारास सदर फ्लॅट वर पी.एस.आय श्री महेश शिंदे व त्यांचे एक सहकारी यांनी घरी येऊन छापा टाकुन [illegible] लॅपटॉप व मोबाईल चेक केला. त्यावेळी पी.एस.आय श्री महेश शिंदे, [illegible] असे म्हणाले की, [illegible] उर्फ जॉय थावराणी असे आप[illegible] [illegible] तुमचे विरुध्द गुन्हा दाखल करायचा [illegible] त्यावेळी पी.एस.आय श्री महेश शिंदे [illegible] गुन्हा दाखल न करण्यासाठी तसेच [illegible] आय.पी.एल क्रिकेट मॅचचा बेटींगचा [illegible] त्यावेळी [illegible] पी.एस.आय श्री महेश शिंदे यांनी [illegible] पी.एस.आय श्री महेश शिंदे यांनी [illegible] फ्लॅटवर [illegible] क्रिकेट मॅचचे बेटींग [illegible] क्रिकेट मॅचचा बेटींगचा धंदा सुरळीत चालु [illegible] पी.एस.आय श्रीमहेश शिंदे यांचे ओळखीचे नाशिकरोड [illegible] दयावे लागतील.

[illegible] माझा चुलतभाउ जय थावराणी याने मला संपर्क करुन [illegible] देवळाली कॅम्प [illegible] पी.एस.आय. श्री.महेश शिंदे यांचा पाच लाख रुपये [illegible] [illegible] गाडी सुध्दा [illegible] श्री महेश शिंदे [illegible] पाच लाख रुपये [illegible] संजय खराटे [illegible] सोडण्यात आले.

[illegible] माझा चुलतभाउ जय थावराणी [illegible] दि.२२/०९/२०२१ रोजी रात्री ८ ते ९ वाजेच्या सुमारास नाशिकरोड देवळाली कॅम्प [illegible] श्री.संजय खराटे यांचे ऑफीसचे [illegible] चारचाकी वाहनात बसुन पी.एस.आय. श्री महेश शिंदे यांची भेट झाली [illegible] चुलतभाउ जय थावराणी [illegible] पाच लाख रुपयांचा [illegible] पी.एस.आय श्री महेश शिंदे [illegible] माहीती [illegible] नाशिक शहर [illegible] नाशिक [illegible] गुन्हा दाखल करायला लावू शकतो [illegible] रुपये दिले नाही तर [illegible] दि.२१/०९/२०२१ रोजी फ्लॅटवर छाप्यामध्ये आय.पी.एल क्रिकेट मॅचवर बेटींग केली म्हणुन गुन्हा दाखल करुन आरोपी करेल [illegible] पी.एस.आय [illegible] चुलतभाउ जय थावराणी [illegible] परंतु मला [illegible] लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक [illegible] माझी [illegible] लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथील पोलीस निरीक्षक श्री [illegible] शिरसाठ यांना नाशिकरोड [illegible] देवळाली कॅम्प [illegible] नाका, [illegible] मंदिराजवळ [illegible] पोलीस निरीक्षक श्री [illegible] शिरसाठ हे सापळा पथकासह दिनांक २९/०९/२०२१ रोजी माझी तक्रार [illegible] नाशिक रोड - देवळाली [illegible] नंबर नाका, शनि मंदिराजवळ [illegible] चारचाकी वाहनासह [illegible] मंदिराजवळ [illegible] पोलीस निरीक्षक श्री [illegible] शिरसाठ [illegible] निरीक्षक श्री [illegible] शिरसाठ [illegible] विभागाकडील श्री [illegible] [illegible] व पंच श्री. [illegible] प्रभाकर गर्जे तसेच सापळा पथकातील [illegible] परिचय करुन देवुन माझाही परिचय सर्वांना करुन दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरसाठ यांनी पचासमक्ष मला माझे तक्रारी बाबत विचारले असता त्यांना मी माझी वरील प्रमाणेची तक्रार सांगुन मला नमुद तक्रार स्वःहस्ताक्षरात लिहिण्यास सांगितली असता, मी सांगितले की, माझे शिक्षण इंग्रजी माध्यमातुन झालेले असल्याने मला मराठी भाषा वाचता येते व बोललेली समजते परंतू मला मराठी लिहायला व्यवस्थीत जमत नाही. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरसाठ यांचे आदेशाने सापळा पथकातील कर्मचारी यांनी त्यांचे हस्ताक्षरात मी सांगितले प्रमाणे तक्रार लिहुन घेतली. त्यावर मी सही केली. तसेच सदर तक्रारीवर पोनि श्री शिरसाठ व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर माझे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीणचे पी.एस.आय.श्री महेश शिंदे हे खरोखरच माझकडे त्यांचे स्वतः साठी लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच श्री काळे असे आम्हाला पोनि श्री शिरसाठ यांनी योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते पोना/कराड यांनी चालू करुन लावून देवुन मला व पंच श्री काळे असे दोघांना माझेकडील चारचाकी वाहनाने नाशिकरोड-देवळाली रोडवरील श्री खराटे यांचे कार्यालयात भेटीकरीता रवाना केले. त्यावेळी पोनि श्री शिरसाठ, पंच श्री. गर्जे व सापळा पथक असे नाशिक रोड - देवळाली कॅम्प रोडवरील सहा नंबर नाका, शनि मंदिराजवळ येथे शासकीय चारचाकी वाहनात थांबुन राहिले होते. त्यानंतर मी व पंच श्री.काळे आम्ही माझे कडील चारचाकी वाहनाने नाशिकरोड-देवळाली रोडवरील श्री खराटे यांचे कार्यालयात पोहचलो असता, तेथे माझा चुलत भाउ श्री.जय थावराणी त्याचेकडील सेलेरिओ चारचाकी वाहनासह हजर होता. त्यानंतर मी, पंच श्री.काळे, संजय खराटे व जय थावराणी असे संजय खराटे यांचे कार्यालयासमोर उभी असलेल्या पांढऱ्या रंगाचे मारुती सेलिरिओ बसलो. त्यानंतर पी एस आय.श्री महेश शिंदे यांनी पंच श्री.काळे व माझा चलुत भाउ जय थावराणी यांचे समक्ष दि २१/०९/२०२१ रोजी आमचे देवळाली कॅम्प येथील फ्लॅट वर टाकलेल्या छाप्या मध्ये आयपीएल क्रिकेट मॅच चे बेटींग चा गुन्हा दाखल न करुन आरोपी न करण्यासाठी तसेच यापुढे ही आयपीएल क्रिकेट बेटींगचा धंदा सुरळीत चालू ठेवण्यासाठी माझेकडे एकुण ४,००,०००/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३,००,०००/-रु त्यांचे मित्र श्री.संजय खराटे यांचेकडे देण्यास सांगीतले.

अशाप्रकारे पी एस.आय.श्री महेश शिंदे यांनी लाचेची रक्कम नंतर देणेबाबत सांगितल्याने मी व पंच श्री.काळे आम्ही माझे चारचाकी वाहनाने पुन्हा सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री शिरसाठ यांचे आदेशावरुन पोना/कराड यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिरसाठ साहेब यांनी मला व पंच श्री काळे यांना घडलेली हकीकत विचारली असता, आम्ही वरील प्रमाणे सांगीतलेल्या हकिगती वरुन व व्हाईस रेकॉर्डरमध्ये माझेत व पी एस.आय.श्री.महेश शिंदे तसेच माझा चुलत भाउ जय थावरानी यांचेत रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस निरीक्षक श्री शिरसाठ, पंच व सापळा पथकातील सदस्यांनी ऐकल्यानंतर पी एस आय.श्री श्री.महेश शिंदे यांनी आयपीएल क्रिकेट मॅच चे बेटींग चा गुन्हा दाखल न करुन आरोपी न करण्यासाठी तसेच यापुढे ही आयपीएल क्रिकेट बेटींगचा धंदा सुरळीत चालू ठेवण्यासाठी त्यांचे स्वतः साठी ४,००,०००/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३,००,०००/-रु. त्यांचे मित्र श्री.खराटे यांचेकडे देण्यास सांगीतले असल्याची सर्वांची खात्री झाली. परतू त्यानंतर पी.एस.आय .श्री.महेश शिंदे हे तेथुन निघुन तात्काळ मुंबई येथे गेल्याने लाचेची रक्कम नंतर पुन्हा येउन श्री.खराटे यांना त्यांचे कार्यालयात देण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरसाठ यांनी मला माझेकडील चारचाकी वाहनासह घरी जाण्यास सांगितले.

दि.२९/०९/२०२१ रोजी श्री.संजय खराटे यांनी माझा चुलत भाउ जय थावरानी यांचेशी संपर्क साधुन पीएसआय श्री महेश शिंदे यांनी ठरल्याप्रमाणे प्रमाणे लाचेची ३,००,०००/-रु रक्कम मला श्री संजय खराटे यांचेकडे देण्यास सांगीतले बाबत मला निरोप दिला. त्यानंतर मी तात्काळच नमुद हकीगत पोलीस निरीक्षक श्री.शिरसाठ यांचेशी संपर्क साधुन त्यांना सांगीतली. तसेच दि ३०/०९/२०२१ रोजी मी त्यांना देवळाली कॅम्प येथील महालक्ष्मी मंदीराजवळील हॉटेल एक्सप्रेसचे समोर पुढील कारवाई करण्यासाठी येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. शिरसाठ हे सापळा पथकासह त्यांचेकडील खाजगी चारचाकी वाहनाने देवळाली कॅम्प येथील महालक्ष्मी मंदीराजवळील हॉटेल एक्सप्रेस च समोर पोहचले. त्यावेळी मी माझेकडील चारचाकी वाहनासह तेथे हजर होतो.

त्यानंतर पी एस.आय.श्री.महेश शिंदे यांनी ३,००,०००/-रु. लाचेची रक्कम मागणी करुन तो पीएसआय श्री. महेश शिंदे यांचे ओळखीचे श्री.संजय खराटे यांचेकडे देण्यास सांगीतल्याने मला व पंच श्री.काळे यांना नाशिकरोड-देवळाली रोडवरील श्री खराटे यांचे कार्यालयात पाठविण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोनि श्री.शिरसाठ यांचे सुचने प्रमाणे मी काल पंचासमक्ष पी एस.आय श्री.महेश शिंदे व ओळखीचे श्री.खराटे यांना देण्यासाठी माझेकडे ३,००,०००/-रु रक्कम यावेळी उपलब्ध नसल्याचे सांगून फक्त ५०,०००/-रु. उपलब्ध असल्याचे सांगितले. त्यानंतर मी माझ्याकडे असलेल्या २,०००/- रु दराच्या २५ चलनी नोटा पोलीस निरीक्षक श्री शिरसाठ यांचेकडे दिल्या. मी उर्वरीत २,५०,०००/-रु रक्कम देण्यास असमर्थता दर्शविल्याने सर्वानुमते ठरल्याप्रमाणे पोनि श्री शिरसाठ यांनी त्यांचे किटबॅगमधील उर्वरीत २,५०,०००/-रु. रक्कमेच्या २,०००/- रु.दराच्या १२५ डमी नोटा नमुद ५०,०००/- रुपयांच्या चलनी नोटांमध्ये एकत्रीत करुन देण्याचे ठरले. त्याप्रमाणे पोनि श्री शिरसाट यांनी २,०००/- रु दराच्या २५ चलनी नोटा व २,०००/- रु.दराच्या १२५ डमी नोटा अशा एकत्रीत करुन एकुण ३,००,०००/- रुपयांच्या नोटांना सापळा पथकातील पो.ना /अमृतकर यांचे करवी ॲन्थ्रासिन पावडर लावुन त्या नोटा पंच श्री गर्जे यांचेकरवी माझे पॅन्टचे पुढील उजवे बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या. त्याबाबतचा सापळा पुर्व पंचनामा देवळाली कॅम्प येथील महालक्ष्मी मंदीराजवळील हॉटेल एक्सप्रेसचे समोर येथे उभे असलेल्या खाजगी वाहनात लॅपटॉपवर टकलिखीत करण्यात आला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरसाठ यांनी मला व पंच श्री काळे यांना योग्य त्या सुचना दिल्या. श्री संजय खराटे यांना दयावयाची ३,००,०००/-रुपये लाचेची रक्कम देवुन पोना/कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावून दिले. त्यानंतर मी व पंच श्री काळे असे माझेकडील चारचाकी वाहनाने नाशिकरोड- देवळाली रोडवरील श्री खराटे यांचे कार्यालयाजवळ गेलो. तसेच आमचे पाठोपाठ पंच श्री गर्जे व सापळा पथकातील सदस्य असे खाजगी चारचाकी वाहनाने नाशिकरोड-देवळाली रोडवरील श्री.खराटे यांचे कार्यालयाचे आवारात येवून सापळा आयोजीत केला. त्यानंतर मी पी एस आय श्री महेश शिंदे यांनी मागणी केले प्रमाणे तसेच श्री.संजय खराटे यांनी माझा चुलतभाउ जय थावराणी यांचेकडे दिलेल्या निरोपाप्रमाणे मी व पंच श्री काळे असे गाडीतुन उतरलो व गाडीचे जवळ येउन उभे असलेल्या श्री संजय खराटे यांचेकडे नमुद ३,००,०००/-रुपये लाचेची रक्कम दिली असता त्यांनी ती स्विकारुन त्याचे ताब्यात घेतली व लगेचच सदर रक्कम माझा चुलतभाउ जय थावराणी यांचेकडे दिली. त्यानंतर मी लागलीच ठरल्याप्रमाणे माझा डावा हात डोक्यावर फिरवुन लाच स्विकारले बाबतचा पुर्वनियोजीत ईशारा केला. त्याचवेळी माझा चुलतभाउ व श्री संजय खराटे असे लाचेची रक्कम घेउन संजय खराटे यांचे कार्यालयात निघुन गेले. त्याच वेळी पंच श्री काळे व सापळा पथकातील सदस्य असे त्यांचे पाठोपाठ कार्यालयात गेले. त्यावेळी कार्यालयात जाउन ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक चे सापळा पथकाने श्री संजय खराटे यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोलीस निरीक्षक शिरसाठ साहेब यांनी श्री.संजय खराटे यांचेकडे पी एस आय. शिंदे हे कोठे आहेत याबाबत चौकशी केली असता, त्यांनी सांगीतले की, ते त्यांचे घरी किंवा नेमणुकीचे ठिकाणी असू शकता. त्यानंतर पोलीस निरीक्षक शिरसाठ यांनी श्री.संजय खराटे यांचेकडुन पी.एस.आय श्री शिंदे यांचे राहते घराचा पत्ता घेवुन तो सापळा पथकातील डी.वाय.एस.पी.श्री अभिषेक पाटील साहेब यांचेशी संपर्क करुन पीएसआय श्री महेश शिंदे यांचा पत्ता दिला व तात्काळ नमुद पत्त्यावर पोहचुन पी.एस आय शिंदे यांना ताब्यात घेवुन ला.प्र.वि.कार्यालयात घेवुन येणे बाबत सांगुन त्यांचेकडे असलेल्या शासकीय वाहनाने रवाना केले. त्यानंतर श्री.संजय खराटे यांचे कार्यालयाजवळ लोकांची गर्दी होवु लागल्याने, लागलीच सापळा पथक त्यांना ताब्यात घेवुन ला.प्र.वि.नाशिक कार्यालयात पोहचले. मी देखील त्यांचे पाठोपाठ माझे खाजगी वाहनाने ला.प्र.वि.नाशिक कार्यालयात पोहचलो. त्यानंतर काही वेळाने डी.वाय.एस. पी.श्री. अभिषेक पाटील साहेब व त्यांचे सापळा पथक पी एस.आय.महेश शिंदे यांना सोबत घेवुन ला.प्र.वि कार्यालयात आले. व त्यांना पो.निरीक्षक शिरसाठ साहेब यांचे ताब्यात दिले. सदर कारवाईचा सविस्तर सापळा पंचनामा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक येथे केला आहे.

तरी आमचे फ्लॅटवर झालेल्या छाप्यामध्ये आयपीएल क्रिकेट मॅच चे बेटींग चा गुन्हा दाखल न करुन आरोपी नाही करणे तसेच यापुढे ही आयपीएल क्रिकेट बेटींगचा धंदा सुरळीत चालू ठेवण्यासाठी पीएसआय श्री महेश शिंदे यांनी त्यांचे स्वतः साठी ४,००,०००/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३,००,०००/-रु. खाजगी इसम श्री संजय खराटे यांचेकडे देण्यास सांगीतले असता, सदर लाचेची रक्कम दि.३०/०९/२०२१ रोजी १४:१४ वाजता नाशिकरोड-देवळाली रोडवरील श्री.खराटे यांचे कार्यालयाचे आवारात पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक १) श्री.महेश वामनराव शिंदे, वय-३८ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, (वर्ग-२), नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण, राहणार- कालीका नगर, त्रिकोणी बंगल्याचे मागे, हिरावाडी, नाशिक तसेच २) श्री.संजय आझाद खराटे, वय-४५ वर्षे, खाजगी इसम राहणार-गंगा निवास, टाउन हॉल शेजारी, एम.जी.रोड, नाशिक यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचुन पाहिली असुन ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(सही)
पोलीस [illegible] अंमलदार
उपनगर पोलीस स्टेशन, नाशिक

हि फिर्याद दिली

(सही)
हरीष उर्फ बॉबी प्रेम थावरानी